ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 12 छापील पाने आहेत.

अनुक्रमांक | | | | | | | | | | | | |    कोड नं. **71/S/204/A/M**

सेट - **A**

# मराठी

# (204)

परीक्षेचा दिवस आणि तारीख ______________________

निरीक्षकाची सही 1. ______________________

2. ______________________

UNNATI EDUCATIONS

**सामान्य अनुदेश :**

1. सर्व प्रश्नांचे उत्तर तुम्हाला दिलेल्या उत्तर–पुस्तिकेतच लिहायची आहेत.
2. या प्रश्न–पत्रिकेला वाचण्यासाठी 15 मिनिटाचा वेळ दिला गेला आहे. प्रश्न–पत्रिकेचे वितरण दुपारी **02.15** वाजता करण्यात येईल. **02.15** ते **02.30** पर्यंत विद्यार्थी केवळ प्रश्न–पत्रिका वाचतील आणि या वेळेत उत्तर–पुस्तिकेत कोणतेही उत्तर लिहणार नाहीत.
3. परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.
4. कृपाकरून प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रूपात असावी.
5. बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमध्ये योग्य उत्तर लिहायचे आहे.
6. बहुपर्यायी प्रश्नांच्या सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.
7. उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.
8. आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेची कोड संख्या **71/S/204/A/M,** सेट - **A** लिहावेत.



**UNNATI EDUCATION**
**9899436384: 9654-279-279**

**मराठी**

**(204)**

**वेळ : 3 तास]** **[एकूण गुण : 100**

**निर्देश :**

(i) या प्रश्नपत्रिकेत एकूण **37** प्रश्न आहेत आणि सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(ii) प्रश्नपत्रिकेत दोन विभाग आहेत. विभाग–**अ** आणि विभाग–**ब**

(iii) विभाग 'अ' मध्ये वस्तुनिष्ठ/बहुपर्यायी प्रश्न आहेत तर विभाग 'ब' मध्ये विषयनिष्ठ/वर्णनात्मक प्रश्न आहेत. विभाग **अ – 50** गुण व विभाग **ब – 50** गुण आहेत = **100** गुण

(iv) विभाग 'अ' मध्ये एकूण **27** प्रश्न आहेत.

- प्रश्न क्र. **1** ते **12** गद्‌य
- प्रश्न क्र. **13** ते **20** पद्‌य
- प्रश्न क्र. **21** ते **27** व्याकरण

(v) विभाग 'ब' मध्ये एकूण **28** ते **37** प्रश्न आहेत.

- प्रश्न क्र. **28** ते **30** गद्‌य–पद्‌य
- प्रश्न क्र. **31** ते **32** व्याकरण
- प्रश्न क्र. **33** ते **34** उताऱ्यावरील प्रश्न
- प्रश्न क्र. **35** ते **37** लेखन कौशल्यावर आधारित उदा. निबंधलेखन, पत्रलेखन व सारांशलेखन इ.



UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR
UNNATI EDUCATION
9899436384: 9654-279-279

## विभाग–अ (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न)

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1 आचार्य विनोबा भावे यांनी भगवद्‌गीतेचा सुबोध अनुवाद केलेला ग्रंथ कोणता? 1

(अ) मधुकर (ब) ययाती

(क) गीताई (ड) गीतारहस्य

2 शेतकऱ्यांवर अधिकाऱ्यांनी दुप्पट शेतसारा का बसवला? 1

(अ) शेतकऱ्याचे उत्पन्न जास्त होते.

(ब) शेतकरी त्यांच्याशी उर्मटपणे वागला होता.

(क) शेतसारा बसवण्याची ती पद्धतच होती.

(ड) शेतकऱ्याने अधिकाऱ्याला लाच दिली नव्हती.

3 महर्षी कर्वे यांचे मृत्यूसमयी वय किती होते? 1

(अ) एकशे पाच (ब) एकशे दहा

(क) शंभर (ड) नव्वद

4 चूक की बरोबर ते लिहा. 3

(1) 'स्वभाषेची अभिवृद्धी' या पाठाचे लेखक लो. टिळक आहेत.

(2) नागू गवळी अंगाने चांगला सडपातळ होता.

(3) भीष्माचार्य हे महाभारतातील श्रेष्ठ पुरुष होते.

UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR

5 रिकाम्या जागा भरा. 3

(1) डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी _______ या संघटनेची स्थापना केली.

(2) लक्ष्मीबाई नारायण टिळक यांनी _______ हे आत्मचरित्र लिहिले.

(3) भाषेची अभिवृद्धी लोकांच्या व _______ अभिवृद्धीवर अवलंबून असते.

6 जोड्या लावा – पाठ व पाठाचे लेखक यांच्या जोड्या लावा. 4

| | (पाठ) 'अ'गट | (लेखक) 'ब'गट |
|---|---|---|
| (1) | स्वभाषेची अभिवृद्धी | द. मा. मिरासदार |
| (2) | झोप | लोकमान्य टिळक |
| (3) | महर्षींचे स्वर्गारोहण | वि.स. खांडेकर |
| (4) | श्री | आचार्य प्र. के. अत्रे |



UNNATI EDUCATION
9899436384: 9654-279-279

7 दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. 2

(1) शास्त्रात प्रथम '______' असे सांगितले आहे.

(अ) पितृदेवो भव (ब) मातृदेवो भव

(क) आचार्य देवो भव (ड) यशस्वी भव

(2) लग्नापूर्वी नागू गवळयाचा जास्त वेळ ______ या गोष्टीत जायचा

(अ) तालमीच्या मातीत लोळत पडणे

(ब) दूध घालणे

(क) शेतात काम करणे

(ड) यांपैकी काहीही नाही

8 शेतकरी आत्महत्या करत नाही कारण ______ 1

(अ) तो सुखात होता.

(ब) त्याला जगण्याची जबर इच्छा होती.

(क) त्याचे गाऱ्हाणे अधिकाऱ्यांनी एकले होते.

(ड) कुटुंबातील बायका–मुले निराधार होतील.

9 समाजकंटकानी महर्षी कर्वे यांचा छळ केला कारण ______ 1

(अ) अण्णांनी आयुष्यात खूप चमत्कार केले.

(ब) त्यांनी एका विधवेशी पुनर्विवाह केला.

(क) ते दीर्घायुष्यी होते.

(ड) ते कठोर शिस्तपालन करीत.

10 केशवचे नाव शाळेतून कमी करण्यात आले कारण ______ 1

(अ) मुलांनी शाळेवर बहिष्कार टाकला.

(ब) पालकांनी मुलांवर दबाव टाकला.

(क) केशवने चूक झाली म्हणण्यास नकार दिला.

(ड) केशवने चूक झाली म्हणण्यास होकार दिला.



UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR
UNNATI EDUCATION
9899436384: 9654-279-279

11 कामवाली बाई लक्ष्मीबाई टिळकाच्या घरचे खात नसे कारण ______ 1

(अ) कामवाल्या बाईचे ज्ञातवाले नाव ठेवतात.

(ब) कामवाल्या बाईला दुसऱ्याच्या हातचे आवडत नाही.

(क) कामवाली बाई श्रीमंत होती.

(ड) नामवाली बाई उर्मट होती.

12 'श्री' आणि सरस्वती यांच्यामध्ये ______ आकडा असतो. 1

(अ) त्रेसष्टचा (ब) छत्तीसचा

(क) पन्नासचा (ड) अडतीसचा

13 'पसायदान' कवितेचे कवी कोण? 1

(अ) संत ज्ञानेश्वर (ब) संत तुकाराम

(क) संत एकनाथ (ड) संत नामदेव

14 या जन्मावर, या जगण्यावर कितीदा प्रेम करावे? 1

(अ) एकदा (ब) शतदा

(क) हजारदा (ड) दोनदा

15 चूक की बरोबर ते लिहा. 3

(1) या देशाची माती अपवित्र आहे.

(2) सूर्य हे ज्ञानाचे, प्रकाशाचे व समृद्ध जीवनाचे प्रतीक आहे.

(3) एका तळ्यात सुरेख बदके पिले होती.

16 रिकाम्या जागा भरा. 3

(1) बलसागर भारत होवो। विश्वात ______ राहो॥

(2) दुरितांचे ______ जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।

(3) रंगांचा उघडुनिया ______ सांज कुणी हो केली?



UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR
UNNATI EDUCATION
9899436384: 9654-279-279

17 कविता आणि कवी यांच्या जोड्या लावा. 4

| (कविता) 'अ' गट | (कवी) 'ब' गट |
|---|---|
| (1) बलसागर भारत होवो | शांता शेळके |
| (2) एका तळ्यात होती | नामदेव ढसाळ |
| (3) आता | साने गुरुजी |
| (4) पहा टाकले पुसुनी डोळे | ग. दि. माडगूळकर |

18 दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. 1

अभाळमुका घेणाऱ्या हवेल्यांना काय लावला पाहिजे ?

(अ) रंग (ब) सुरुंग

(क) बॉम्ब (ड) खांब

19 वीरपत्नी पुढच्या शतकात कोणती गोष्ट पोहोचविण्यास सांगत आहे ? 1

(अ) निरोप (ब) पराक्रम

(क) वारसा (ड) शौर्य

UNNATI
EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR

20 तळयातील इतर बदके 'त्या' बदकाला काय म्हणत असत ? 1

(अ) वेडे (ब) बावळट

(क) भित्रे (ड) रडे

21 'सावळाच रंग तुझा पावसाळी नभापरी!' या ओळीतील अलंकार ओळखा. 1

(अ) अनुप्रास (ब) उपमा

(क) दृष्टांत (ड) यमक



UNNATI EDUCATION
9899436384: 9654-279-279

22 <u>हिमालय</u> हे भारताचे भूषण आहे. **1**

अधोरेखित शब्दाचा प्रकार लिहा.

(अ) क्रियापद (ब) विशेषण

(क) सर्वनाम (ड) नाम

23 चूक की बरोबर लिहा. **3**

(अ) नामाऐवजी येणाऱ्या शब्दाला 'सर्वनाम' असे म्हणतात.

(ब) सर्व म्हणींमध्ये मोजक्या पण चटकदार शब्दांत अनुभव किंवा व्यवहारज्ञान सांगितलेले नसते.

(क) वाक्य किंवा विधान पूर्ण झाले हे दाखविण्यासाठी वाक्याच्या शेवटी पूर्ण विराम देतात.

24 दिलेल्या पर्यायांमधून अचूक शुद्ध शब्द ओळखा. **3**

(1) (अ) निर्माल्य (ब) र्निमाल्य (क) निमार्ल्य (ड) नीर्माल्य

(2) (अ) शुभाशित (ब) सुभाषीत (क) सूभाषित (ड) सुभाषित

(3) (अ) कींचित (ब) किंचित (क) कीचींत (ड) किचिंत

UNNATI EDUCATIONS EK KADAM UNNATI KI AUR

25 दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. **3**

(1) दोन शब्द किंवा दोन वाक्ये जोडणाऱ्या अविकारी शब्दांना काय म्हणतात?

(अ) क्रिया विशेषण अव्यये (ब) केवल प्रयोगी अव्यये

(क) उभयान्वयी अव्यये (ड) शब्दयोगी अव्यये

(2) 'गणेशाला <u>लाल</u> फूल वाहतात.' अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा.

(अ) विशेषण (ब) नाम

(क) सर्वनाम (ड) क्रियापद

(3) योग्य पदक्रम असलेले वाक्य ओळखा

(अ) सुंदर आईचे प्रेम (ब) आईचे सुदंर प्रेम

(क) प्रेम सुंदर आईचे (ड) प्रेम आईचे सुंदर



UNNATI EDUCATION
9899436384: 9654-279-279

26 सूचनेप्रमाणे लिहा. 2

पुढे दिलेल्या शब्दसमूहाला एक शब्द सुचवा.

(अ) सर्व काही जाणणारा

(ब) सत्याचा आग्रह धरणारा

27 खालील शब्दांच्या विरुद्धार्थी शब्दांत जोड्या जुळवा. 2

| | |
|---|---|
| (अ) असली | (अ) परतंत्र |
| (ब) मान | (ब) अज्ञानी |
| (क) स्वतंत्र | (क) नकली |
| (ड) ज्ञानी | (ड) अपमान |

## विभाग–ब (विषयनिष्ठ / वर्णनात्मक प्रश्न)

UNNATI EDUCATIONS

28 खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे **20** ते **30** शब्दांत लिहा. 6

(अ) शास्त्रात आईचा गौरव कोणत्या शब्दांत केला आहे ?

(ब) शेतकऱ्याच्या मुलीचा सासरा तिला का नांदवत नाही ?

(क) डॉ. हेडगेवार यांनी आपल्या संघटनेचा विस्तार करण्यासाठी कोणत्या गोष्टी केल्या ?

(ड) वि.स. खांडेकरांचे अपरिग्रहव्रत कोणते ?

29 खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे **20** ते **30** शब्दांत लिहा. 6

(अ) कवी साने गुरुजी यांनी कोणती प्रतिज्ञा केली आहे ?

(ब) सूर्याकडे पाठ फिरवून शतकांचा प्रवास कुणी व कसा केला ?

(क) वीरपत्नी आपल्या पतीला रणांगणावर कसे जाण्यास सांगत आहे ?

(ड) कवी पाडगावकरांना बाळाच्या बोबड्या हाकेची आठवण का होते ?



UNNATI EDUCATION
9899436384: 9654-279-279

30 खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे **30** ते **50** शब्दांत लिहा. **6**

(अ) लो. टिळकांच्या मते आपल्या भाषेवर आपले प्रेम का असते?

(ब) 'महर्षी कर्वे हे एक अद्भूत चमत्कार होते' असे प्र. के. अत्रे का म्हणतात?

(क) राजहंसाच्या वाट्याला कोणेत दु:ख आले व त्याचा आत्मविश्वास कसा जागृत झाला?

(ड) कोणता 'वर' मिळाल्यामुळे ज्ञानदेव सुखी झाले?

31 (अ) रिकाम्या जागी योग्य समूहवाचक शब्द लिहा. **2**

(अ) पुस्तकांचा _______

(ब) भाकरीची _______

**किंवा**

'त्राण न राहणे' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

(ब) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. **2**

(अ) अरण्य _______

(ब) आकाश _______

(क) पाणी _______

(ड) वडील _______

32 कंसातील सूचनेनुसार प्रश्न सोडवा. **4**

(अ) हुशार विद्यार्थी शिक्षकाला आवडतो. **2**

(या वाक्यातील विशेषण शोधून लिहा.)

(ब) शाबास ! असेच यश तुला नेहमी मिळो.

(या वाक्यातील केवल प्रयोगी अव्यय शोधून लिहा.)

**किंवा**



UNNATI EDUCATION
9899436384: 9654-279-279

‘क्षमा’ हे शस्त्र त्याच्या जवळ आहे.

(या वाक्यात वापरलेली विरामचिन्हे ओळखा व लिहा.)

(ब) खालील वाक्यातील काळ ओळखा. 2

(अ) आकाशात काळे ढग आहेत.

(ब) मी पुस्तक वाचले.

33 खालील उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

भारतीय संस्कृतीत त्याग व पावित्र्य या दोन गुणांना अत्यंत मोठे स्थान आहे. भारतीय मनुष्य केवळ पैशाला, सत्तेला मान देत नाही; त्या गुणांबरोबर त्याग व पावित्र्यही हवेच. भारतीय जनतेने राजांच्या पालख्या कधी उचलल्या नाहीत; परंतु संतांच्या पालख्या दरवर्षी लाखो लोक घेऊन जातात. जनक केवल राजा होता म्हणून नाही, तर ज्ञानी असून विरक्त होता; म्हणून तो प्रातःस्मरणीय होता. त्यागाशिवाय ज्ञान नाही. आसक्ताला ज्ञान कोठून असणार? ज्ञान म्हणजे अद्वैतज्ञान. ज्ञान म्हणजे अद्वैताची अनुभूती. ही अद्वैताची अनुभूती जसजशी अधिकाधिक जीवनात येते, तसतसा त्याग अधिक होऊ लागतो; म्हणून त्याग हे अद्वैताचे लक्षण भारतीय संस्कृती मानते.

EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR

– साने गुरुजी

(1) भारतीय संस्कृतीत कोणत्या दोन गुणांना स्थान आहे? 1

**किंवा**

भारतीय मनुष्य कशाला मान देत नाही?

(2) भारतीय जनता दरवर्षी कोणाच्या पालख्या मिरविते? 1

**किंवा**

जनक राजा प्रातःस्मरणीय का होता?

(3) ज्ञानाची कोणती व्याख्या साने गुरुजी सांगतात? 1



UNNATI EDUCATION
9899436384: 9654-279-279

34 खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा. 3

पन्नाशीची उमर गाठली अभिवादन मज करू नका.
मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी धरू नका॥
वेतन खाऊन काम टाळणे हा देशाचा द्रोह असे।
करतील दूसरे बघतील तिसरे असे सांगुनी सुटू नका॥
जनसेवेस्तव असे कचेरी ती डाकूंची नसे गुहा।
मेजाखालून मेजावरतून द्रव्य कुणाचे लटू नका॥
लोथट पुतळे पथापथावर ही थोरांची विटंबना।
कणभर त्यांचा मार्ग अनुसरा वांझ गोडवे गाऊनका॥
लाख लाख जन माझ्यासाठी जळले मेले विसरू नका।
मीच विनविते हात जोडुनी वाट वाकडी धरू नका॥

**– कसुमाग्रज**

(1) स्वातंत्र्यदेवी हात जोडून कोणती विनवणी करते? 1

**किंवा**

कवीला कोणते कृत्य देशद्रोह वाटते?

(2) कवीने डाकूंची गुहा कशास म्हटले आहे? 1

**किंवा**

थोरांची विटंबना कशामुळे होते?

(3) स्वातंत्र्यदेवी कोणाला विसरु नका असे सांगते? 1



UNNATI EDUCATION
9899436384: 9654-279-279
UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR

35 खालील उतारा वाचून स्वतःच्या भाषेत त्याचे एक तृतीयांश शब्दांत सारांश लेखन करा व उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. **4**

आजचा विद्यार्थी असंतुष्ट आहे, असे आज सर्वत्र म्हटले जाते. पण मी विचारतो विद्यार्थ्यांनी संतुष्ट असायला पेन्शन घेतले आहे, की त्यांनी म्हणावे बायकामुले सुखात आहेत? विद्यार्थ्यांनी असंतुष्टच असायला हवे; पण तो असंतोष विघातक नको. त्यातून मशाली पेटल्या पाहिजेत. नाहीतर आपण कचराच पेटवाल. हा असंतोष पूर्वापार चालत आला आहे. तुकाराम काय संतुष्ट तरुण होता? ज्ञानेश्वर असंतुष्ट होते म्हणूनच 'अमृतासे ही पैजा जिंके' अशा भाषेत गीतेचे तत्त्वज्ञान मराठीत आणले. एकाच चिखलात कमक आणि बेडूक दोन्ही असतात; पण तो बेडूक चिखलातच बुडालेला असतो आणि कमळ मात्र चिखलातूनही वर मान करून उभे असते. आपण बेडूक होणार की कमळ होणार ते आपणच ठरवा.

– पु. ल. देशपांडे

36 तुमच्या लहान भावाचा राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. **5**

**किंवा**

आकाशवाणी केंद्र पाहण्याबाबत संचालकांना पत्र लिहा.

UNNATI EDUCATIONS
EK KADAM UNNATI KI AUR

37 खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर 150 ते 200 शब्दांत निबंध लिहा. **6**

(1) माझा आवडता सण

(2) शिवाजी महाराज पुन्हा अवतरले तर

(3) प्रदूषणाची समस्या

(4) फाटक्या पुस्तकाचे मनोगत



UNNATI EDUCATION
9899436384: 9654-279-279